## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३८५० / २०२५ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| प्रभु माधव देशमुख | नायब तहसिलदार, (कुळकायदा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय सातारा. | उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय सातारा. |

**( सुनावणी दिनांक - १० / ०८ / २०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. ०५.०८.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " विहित कालावधीत माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी समक्ष हजर आहेत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन पद्धतीने हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा संक्षिप्त तपशील |
|---|---|
| १८.०९.२०२४ | मौजे पाडळी, ता. कराड, जि. सातारा या ठिकाणच्या जमीन गट क्र. ६०२ या क्षेत्रासंबंधित क्र.मह/३/कु.का./वतन/कावि - ७५६ /२०१३ या प्रकारांची संपूर्ण संचिका. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड, सातारा यांचेकडे वर्ग केला. तथापि, त्यांनतर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड, सातारा यांनी काहीही कार्यवाही केली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल फेटाळले आहे. सदर माहिती न्यायालयीन कामकाजाकरीता अत्यंत आवश्यक आहे. कृपया माहिती देणेबाबत आदेश करावेत."

जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी अवगत केले की, " अपिलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड यांचेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केला आहे. "

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, " अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.०२.०६.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांची माहिती अर्ज नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड यांचेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केला आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार उपलब्ध माहिती देणे अभिप्रत आहे. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी माहिती उपलब्ध नसलेबाबत कळविले असल्याने अपिल निकाली काढले आहे. "

सुनावणी दरम्यानच्या युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे केला असून जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड यांचेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.०२.०६.२०२५ रोजीच्या निकालामध्ये जन माहिती अधिकारी यांची माहिती अर्ज नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड यांचेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग केला आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार उपलब्ध माहिती देणे अभिप्रत आहे. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांनी माहिती उपलब्ध नसलेबाबत कळविले असल्याचे नमुद करून अपिल निकाली काढले आहे. प्रथम अपिलीय आदेशातील विवेचनामध्ये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करण्याबाबत कळविले असल्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर पत्र आयोगास अप्राप्त आहे. अपिलार्थी यांना अद्यापही माहितीचे प्रदान झाले नाही.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे. या गंभीर निष्काळजीपणाबद्दल आयोगाद्वारे जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे. भविष्यात प्राप्त होणाऱ्या माहिती अर्जावर कार्यवाही करताना, त्यांनी माहिती अधिकार कायद्यातील सर्व संबंधित तरतुदींचे काटेकोरपणे आणि विहित कालमर्यादेत पालन करावे, अन्यथा त्यांच्यावर कायद्यानुसार योग्य ती दंडात्मक व शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करणेबाबत शिफारस केली जाईल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने तहसिल कार्यालय, कराड व उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड येथे माहितीचा शोध घेण्याकरिता विशेष पथक नेमण्यात यावे. सदर विशेष पथकाद्वारे शोध घेऊन आढळ झालेली माहिती

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत डाकेने विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३८५० / २०२५ / सातारा 4070/2026 दिनांक - 7/9/2026